पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक-८

सभावृत्तांत

दि.- ५/११/२०१४ वेळ -दुपारी १२:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.५/११/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.जम सोनाली पोपट सभापती
२) मा.ननवरे जितेंद्र बाबा
३) मा.सावळे सिमा रविंद्र
४) मा.सौ. बनसोडे शकुंतला काशिनाथ
५) मा.भोसले राहूल हनुमंतराव
६) मा.पालांडे सुजाता सुनिल
७) मा.सौ.पानसरे अमिना महंमद
८) मा.गिता सुशिल मंचरकर
९) मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११) मा.शेंडगे आशा सुखदेव

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.
मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, मा.खरात- कार्यकारी अभियंता, पापु, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी,जावळे- उपअभियंता पापु, श्री.सोनवणे-उपअभियंता,विदयुत, श्री.दिलीप धुमाळ - उपअभियंता,विदयुत,श्री.शिंदे- उपअभियंता, स्थापत्य, श्रीमती अनघा पाठक- उपअभियंता जलनि:स्सारण, श्री.वाईकर- उपअभियंता स्थापत्य , श्री.अकबर

शेख- कनिष्ठ अभियंता वि, श्री.रविंद्र भोकरे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.भोसले - उद्यान निरीक्षक, हे अधिकारी उपस्थित होते.

------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१) प्र.क्र.६२ फुगेवाडीमधील कुंदननगर या भागामध्ये स्थापत्य विषयक कामांतर्गत विविध रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत-मा.राजेंद्र काटे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.
विषय क्रमांक-२) प्र.क्र.६२ फुगेवाडीमधील स्थापत्य विषयक विविध रस्त्यांचे (फुगेवाडी गावठाण) हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत-मा.राजेंद्र काटे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.
विषय क्रमांक-३) प्र.क्र.६२ फुगेवाडीमधील विविध भागांमध्ये ( लिंबोरे वस्ती,आनंदवन,काटेवस्ती) नवीन ड्रेनेजविषयक लाईन्स टाकणेसाठी अंदाजपत्रकात र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत-मा.राजेंद्र काटे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.
विषय क्रमांक-४) प्र.क्र.६२ फुगेवाडीमधील दापोडी या भागांमध्ये पाणीपुरवठयाविषयक कामांतर्गत विविध कामे करणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत-मा.राजेंद्र काटे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव
विषय क्रमांक-५) प्र.क्र.६२ फुगेवाडीमधील दापोडी या भागांमध्ये विदयुत विषयक कामांतर्गत रस्त्यांवरील नवीन दिवे बसविणे तसेच दुरुस्ती करणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत-मा.राजेंद्र काटे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.
विषय क्रमांक-६) नेहरुनगर येथील मुस्लिम दफनभूमी येथे सुशोभिकरण व विदयुतीकरण व सुखसोयी करणेबाबत-मा.अमिना पानसरे,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव.
विषय क्रमांक-७) रस्तारुंदीकरणात अडथळा ठरणारे शौचालय हलविणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-८) निविदेच्या कामातील जागा बदल करणेबाबत-मा.राहूल भोसले,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-९) निविदेच्या कामातील जागा बदल करणेबाबत-मा.राहूल भोसले,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-१०) निविदेच्या कामातील जागा बदल करणेबाबत-मा.राहूल भोसले,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक–११) प्र.क्र.३९ मधील एस.टी.स्टँड समोरील फुटपाथवरील सार्वजनिक मुतारी काढणेबाबत-मा.सुजाता पालांडे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-१२) डेंग्युच्या रुग्णाची तपासणी मनपाचे रुग्णालये /दवाखान्यामध्ये मोफत करणेबाबत- मा.सुजाता पालांडे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

------

ठराव क्रमांक - ८५ विषय क्रमांक- १

दिनांक ५/११/२०१४ विभाग-

सुचक- मा. राजेंद्र काटे अनुमोदक- मा. राहूल भोसले

संदर्भ- मा. राजेंद्र काटे , मा. राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ फुगेवाडी मधील कुंदननगर या भागातील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांवर मोठया प्रमाणावर सर्वत्र खड्डे झाल्यामुळे नागरिकांना या रस्त्यांवरुन चालताना त्रास सहन करावा लागत असल्याने प्रभाग क्र.६२ फुगेवाडीमधील कुंदननगर या भागामध्ये स्थापत्य विषयक कामांतर्गत विविध रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ८६ विषय क्रमांक- २

दिनांक ५/११/२०१४ विभाग-

सुचक- मा. राजेंद्र काटे अनुमोदक- मा. राहूल भोसले

संदर्भ- मा. राजेंद्र काटे , मा. राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ फुगेवाडी गावठाणमधील अंतर्गत मुख्य रस्त्यांवर मोठे खड्डे झाले असलेमुळे नागरिकांना रस्त्यांवरुन चालताना त्रास सहन करावा लागत असल्याने प्रभाग क्र.६२ फुगेवाडी गावठाण भागातील अंतर्गत मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - ८७ विषय क्रमांक- ३

दिनांक ५/११/२०१४ विभाग-

सुचक- मा. राजेंद्र काटे अनुमोदक- मा. राहूल भोसले

संदर्भ- मा. राजेंद्र काटे , मा. राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ फुगेवाडी मधील विविध भागांमध्ये ड्रेनेजलाईनची दुरुस्ती ,जुन्या तसेच नादुरुस्त झालेल्या ड्रेनेजलाईन्स बदलून नवीन ड्रेनेज लाईन्स टाकणे इ.कामे करणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - ८८ विषय क्रमांक- ४

दिनांक ५/११/२०१४ विभाग-

सुचक- मा. राजेंद्र काटे अनुमोदक- मा. राहूल भोसले

संदर्भ- मा. राजेंद्र काटे , मा. राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ फुगेवाडी मधील दापोडी या भागांमध्ये पाणीपुरवठा विषयक कामांतर्गत पाणी वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्याठिकाणी जलवाहिनी टाकणे,जुन्या व खराब झालेल्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिनी टाकणे,व्हॉल्व बदलणे इ.कामे करणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - ८९ विषय क्रमांक- ५

दिनांक ५/११/२०१४ विभाग-

सुचक- मा. राजेंद्र काटे अनुमोदक- मा. राहूल भोसले

संदर्भ- मा. राजेंद्र काटे , मा. राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ फुगेवाडी मधील दापोडी भागातील उर्वरित काही भागांमध्ये नवीन विदयुत दिवे बसविणे तसेच बंद असलेले दिवे सुरु करणेकरिता (दूरुस्ती) अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९० विषय क्रमांक- ६

दिनांक ५/११/२०१४ विभाग-

सुचक- मा. अमिना पानसरे अनुमोदक- मा. जितेंद्र ननावरे

संदर्भ- मा. अमिना पानसरे, मा. जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव.

नेहरुनगर येथील मुस्लिम दफनभूमीमध्ये जाण्या येण्यासाठी रस्ता नाही त्याचप्रमाणे आवश्यक ते विदयुतीकरण तसेच सुशोभिकरण व येणा-या लोकांसाठी बसण्यासाठी बेंच व पाण्याची सोय अशा अनेक आवश्यक त्या सोयीसुविधा तातडीने करुन देणेत याव्यात. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९१ विषय क्रमांक- ७

दिनांक ५/११/२०१४ विभाग-

सुचक- मा. जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा. राजेंद्र काटे

संदर्भ- मा., जितेंद्र ननावरे,मा. राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव.

महात्मा फुलेनगर समोरील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे शौचालय काढून टाकणेची कार्यवाही करणेत यावी.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९२ विषय क्रमांक- ८
दिनांक ५/११/२०१४ विभाग-
सुचक- मा. राहूल भोसले अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा. राहूल भोसले, मा. शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३८ नेहरुनगर येथे नेहरुनगर मधील मनपा कोंडवाडयाचे स्थापत्य विषयक कामे करणे निविदा क्र.२/७७/२०१४-२०१५ र.रु. ७४९४३२/- हे निविदेचे काम तत्कालीन क प्रभाग कार्यालयात काढण्यात आले होते. तरी सदरील मनपा वर्कशॉप हे क्षेत्र नवीन क्षेत्रीय कार्यालय रचनेनुसार ई क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रामध्ये प्रभाग क्र.२९ मध्ये स्थलांतरीत झालेले आहे. तरी नेहरुनगरमधील मनपा वर्कशॉप मधील स्थापत्य विषयक कामे करणे या कामातून क क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.३८ मध्ये स्थापत्यविषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९३ विषय क्रमांक- ९
दिनांक ५/११/२०१४ विभाग-
सुचक- मा. राहूल भोसले अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा. राहूल भोसले, मा. शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३८ नेहरुनगर येथे नेहरुनगर मधील मनपा वर्कशॉप मधील स्थापत्य विषयक कामे करणे निविदा क्र.२/६७/२०१४-२०१५ र.रु. ७४९४३२/- हे निविदेचे काम तत्कालीन क प्रभाग कार्यालयात काढण्यात आले होते. तरी सदरील मनपा वर्कशॉप हे क्षेत्र नवीन क्षेत्रीय कार्यालय रचनेनुसार ई क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रामध्ये प्रभाग क्र.२९ मध्ये स्थलांतरीत झालेले आहे. तरी नेहरुनगरमधील मनपा वर्कशॉप मधील स्थापत्य विषयक कामे करणे या कामातून क क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.३८ मध्ये स्थापत्यविषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९४ विषय क्रमांक-१०
दिनांक ५/११/२०१४ विभाग-
सुचक- मा. राहूल भोसले अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा. राहूल भोसले, मा. शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३८ नेहरुनगर येथे नेहरुनगर मधील मनपा कचरा डेपो मधील स्थापत्य विषयक कामे करणे निविदा क्र.२/२०/२०१४-२०१५ र.रु. ७४९४३२/- हे निविदेचे काम तत्कालीन क प्रभाग कार्यालयात काढण्यात आले होते. तरी सदरील मनपा वर्कशॉप हे क्षेत्र नवीन क्षेत्रीय कार्यालय रचनेनुसार ई क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रामध्ये प्रभाग क्र.२९ मध्ये स्थलांतरीत झालेले आहे. तरी नेहरुनगरमधील मनपा वर्कशॉप मधील स्थापत्य विषयक कामे करणे या कामातून क क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.३८ मध्ये स्थापत्यविषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९५ विषय क्रमांक-११
दिनांक ५/११/२०१४ विभाग-
सुचक-मा.सुजाता पालांडे अनुमोदक -मा.अमिना पानसरे
संदर्भ -मा.सुजाता पालांडे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

प्र.क्र.३९ मधील वल्लभनगर एस.टी.स्टँड समोरील फुटपाथवरील स्त्री व पुरुषांच्या मुता-या मोडकळीस आल्यामुळे त्या पाडून टाकणेत याव्यात. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - ९६ विषय क्रमांक-१२
दिनांक ५/११/२०१४ विभाग-
सुचक-मा.अमिना पानसरे अनुमोदक -मा.सुजाता पालांडे
संदर्भ -मा.अमिना पानसरे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची रुग्णालये / दवाखान्यामध्ये डेंग्युच्या रुग्णांची तपासणी ही मोफत करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(जम सोनाली पोपट)
सभापती
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/८२३ /२०१४दि. २४/ ११ /२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

---